# एका चमूने रोमन सैन्य अधिकाऱ्याला आणि त्याच्या मित्रांना येशूची ओळख करुन घेण्यास मदत केली

*पुढील पैकी मुलां साठी कोणतीही कृती निवडा.*

**प्रार्थना:** *''प्रिय प्रभू, आमच्या मुलांनी एकत्रित काम करावे, प्रेमाने एकमेकांना मदत करावी, तुझी व इतर लोकांची सेवा करावी यासाठी कृपा करून त्यांचे साहाय्य कर.''*

**मोठया मुलाने अथवा शिक्षकाने प्रे.कृ.अध्याय १०** *मधून कर्नेल्याचा वृत्तांत वाचून दाखवावा किंवा सांगावा. कर्नेल्य हा रोमन सैनिकांचा अधिकारी होता. यापो येथील पेत्र व त्याच्या सहकाऱ्यांनी एकजूटीने काम करून दुसऱ्या शहरातील यहूदितर विश्वासणाऱ्यांमध्ये पहिल्या मंडळीची कशी स्थापना केली ते यावरून समजते. वृत्तांत सांगून् झाल्यावर पुढील प्रश्न विचार. (प्रत्येक प्रश्नांनतर उत्तरे दिली आहेत.)*

- *कर्नेल्य हा कशा प्रकारचा मनुष्य होता? (पाहा वचन २)*
- *कर्नेल्याला येशू विषयी सांगण्यास पेत्राबरोबर कोणकोण गेले होते? (पाहा वचन २३)*
- *पेत्राच्या यहूदीतर लोकांकडे बघण्याच्या दृष्टिकोनाबद्दल देवाने त्याला स्वप्नाच्या द्वारे काय शिकवले? (पाहा वचन २८)*
- *कर्नेल्याबरोबर सुवार्ता ऐकण्यास आणखी कोण उत्सुक होते? (पाहा वचन २४)*
- *कर्नेल्य आणि त्याचे इतर मित्र ह्यांच्यावर पवित्र आत्मा केव्हा आला? (पाहा वचन ४४)*
- *त्यांचा बाप्तिस्मा केव्हा झाला? (पाहा वचन ४८)*

*प्रे.कृ. अध्याय १० मधून पेत्र व कर्नेल्य ह्यांच्या वृत्तांताचे* **नाट्यीकरण करा.**



- *ही नाटिका सादर करण्यासाठी मुख्य उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करुन वेळ ठरवा.*
- *ह्या नाटिकेतील सर्व भागांचा तुम्ही उपयोग केला पाहिजे असे नाही.*
- *मुलांकडून नाटकाची तयारी करून घेण्यासाठी वेळ द्या.*
- *मोठ्या मुलांनी लहान मुलांची तयारी करावी.*
- **मोठया मुलांनी** *आणि प्रौढांनी* **निवेदक, कर्नेल्य, पेत्र व देवाची वाणी** *ह्या भूमिका कराव्यात, देवाची वाणी ही भूमिका करणाऱ्याने हातात चादरीची घडी धरून ठेवावी.*
- *लहान मुलांना पेत्राच्या स्वप्नातील* **प्राणी, विश्वासणारे** *आणि* **दोन सैनिक** *ह्या भूमिका द्या. सैनिकांनी भाला म्हणून हातात दोन लांल काठ्या घ्याव्यात.*
- *नाटिका पाहाऱ्या लोकांनी कर्नेल्याचे मित्र व्हावे.*

**निवेदक:** *प्रे.कृ. १०:१-८ हया शास्त्रभागातून वृत्तांताचा पहिला माग सांगावा. आणि भग म्हणा, ''कर्नेल्य शांतपणे प्रार्थना करीत आहे. देव त्याला काय म्हणत आहे ते ऐका.''*

**देवाची वाणी:** *''कर्नेल्या, तुझी प्रार्थना मी ऐकली. तू केलेली माझी सेवाही मी पाहिली. तर आता जाऊन माझा सेवक पेत्र याचा शोध घे.''*

**निवेदक:** *प्रे.कृ.१०:९-२३ ह्या शास्त्रभागातून वृत्तांताचा दुसरा भाग सांगून म्हणा, ''पेत्र शांतपणे प्रार्थना करीत आहे. देव त्याला काय सांगत आहे ते ऐका.''*

**देवाची वाणी:** *सर्वांना दिसेल अशारितीने चादर धरा. मग ती खाली अंथरा. पुढे म्हणा, ''पेत्रा, तुला भूक लागली हे मला माहित आहे. हे प्राणी मारून खा.''*

**प्राणी:** *खाली वाकून चादरीवर सरपटल्यासारखे चाला. काहीजण डुकराचा आवाज काढतील तर काही सापासारखे फुत्कार टाकतील.*

**पेत्र:** *''नको प्रभू! साप आणि डुक्करे खाल्ली तर आपला यहूदी रिवाज मोडेल ना!''*

**देवाची वाणी:** *''मी जे शुध्द केले आहे ते तू निषिद्ध मानू नकोस यातून मारून खा.''*

**पेत्र आणि देवाची वाणी:** *पेत्र दोन वेळा निषिद्ध मांस खाण्यास नकार देतो आणि प्रत्येक वेळी देवाची वाणी उत्तर देते ''मी हे प्राणी शुद्ध केले आहेत. त्यातून मारून खा.''*

**सैनिक:** *पेत्राकडे जाऊन म्हणा ''कैसरियातील कर्नेल्याच्या घरी चला.''*

**पेत्र:** *''माझ्या संस्कृतीनुसार यहूदीतर माणसाच्या घरी जाणे चूक असले तरी देवाने मला तुमच्याबरोबर जाण्यास सांगितले आहे. तुम्ही आत या आजची रात्र येथे राहा.''*

**विश्वासणारे:** *''पेत्रा, आमचाही येशूवर विश्वास आहे. आम्हीही तुझ्याबरोबर मदतीसाठी कैसरियाला येतो.''*

**निवेदक:** *प्रे.कृ.१०:२४-४८ ह्या शास्त्रभागातून वृत्तांताचा तिसरा भाग सांगा मग म्हणा, ''तुम्ही सर्वजण नाटिका पाहणारे आता कर्नेल्याचे कुटुंबीय व भिन्न आहात. पेत्र काय म्हणतो ते ऐका.''*

**पेत्र:** *''कर्नेल्य, तुला येशूविषयी ऐकण्यासाठी म्हणून तू आम्हांला बोलावलेस. देवाने तुझा व तुझ्या संस्कृतीचा स्वीकार केला असल्याचे त्याने मला स्वप्नात दाखवाले. तुझे तारण व्हावे म्हणून तो मरण पावला व मरणातून पुन्हा उठला!''*

**कर्नेल्य:** *''आम्ही पापी आहोत आणि आम्हांला येशूची गरज आहे अशी पवित्र आत्म्याने आमची खात्री पटवली आहे!''*

**पेत्र:** *कर्नेल्याच्या मित्रांकडे (नाटक पाहणाऱ्या सर्व प्रेक्षकांकडे) बोट दाखवून म्हणा, ''पाहा, बंधुजनहो, त्यांना पवित्र आत्मा मिळालेला आहे! आता आपण त्यांना बप्तिस्मा देऊ या!''*

**निवेदक** *किंवा मोठा मुलगाः मदत करणाऱ्या सर्वांचे आभार माना.*

*मुलांनी वृत्तांताचे नाट्यीकरण प्रौढांसाठी केले असेल तर वर दिलेले प्रश्न मुलांनी मोठ्यांना विचारावेत.*



*एक डुकराचे चित्र काढा. मुलांनी तसेच चित्र काढून पुढच्या उपासनेच्या वेळी मोठ्या माणसांना दाखवावे. देव सर्व प्रकारच्या संस्कृतीतील लोकांना तारणा करण्यासाठी पाचारण करतो, ते काय खातात याचाशी त्याचा काही संबंध नसतो हे या चित्रावरून त्यांना स्पष्ट करून सांगता येईल.*

*इतर संस्कृतीच्या वा जातींच्या लोकांशी येशू विषयी बोलणे कोणत्या गोष्टीमुळे अवघड वाटते, याची आणखी उदाहरणे देण्यास मुलांना सांगा. मुलांना उदाहरणे देऊ दया.*

*मोठी मुले रोमन सैनिकाचे चित्र काढतील (ह्या अभ्यासाच्या पहिल्या पानावर पाहा), कर्नेल्य चांगला माणूस होता, त्याने येशूवर कशा प्रकारे विश्वास ठेवून आपल्या मित्रांना सुवार्ता ऐकण्यास साहाय्य केले याची त्यांना आठवण होईल.*

**पाठ करा** *२ (पहिला भाग): ''परमेश्वराचे नेत्र अखिल पृथ्वीचे निरीक्षण करीत असतात, जे कोणी सात्विक चित्ताने त्याच्याशी वर्ततात त्यांचे साहाय्य करण्यात तो आपले सामर्थ्य प्रगट करितो.''*

**कविता.** *चार मुलांना स्तो ६७:१,२,३ व ४ ही वचने एकेक करून म्हणायला सांगा.*

*आपल्याला एकत्रित्र पणे काम करून इतर संस्कृतीतील लोकांना येशू विषयी कसे सांगता येईल याबद्दल मोठ्या मुलांना कविता, गीते किंवा लहानसे नाटुकले लिहिण्यास सांगा त्यांना आठवडाभराचा वेळ द्या.*

**प्रार्थना:** *''प्रिय प्रभू, तू सर्व राष्ट्रांतील लोकांचे पातक व मरण यापासून सुटका केलीस म्हणून आम्ही तुझी स्तुती करतो. ते लोक आमच्यापेक्षा वेगळ्या संस्कृतीतील असले तरी त्यांच्यावर प्रेम करण्यास आणि त्यांना येशूबद्दल सांगण्यास आमचे साहाय्य कर.''*

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net